**सहाय्यक वनसंरक्षक, संरक्षण (वन्यजीव), संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (पूर्व), मुंबई - ६६ यांचे कार्यालय**
Tel: 28860362/389 Email : sgnpmumbai@gmail.com

विषय :- संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनहद्दीपासुन सद्यस्थितीत १० किमी परिसरातील व्यावसायीक बांधकामांना NBWL (National Board of Wildlife) ची परवानगी घेणेबाबत.

जावक क्र. सवसं सं(वजी) /३६६ /२०१५-१६
बोरीवली, दिनांक ०३/१२/२०१५.

प्रति,
उपप्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव) पुर्व उपनगरे
लाल बहादुर शास्त्री मार्ग
विक्रोळी (पश्चिम) मुंबई
राज लिगसी कॉम्लेक्सलगत

संदर्भ :-१) गोवा फाऊंडेशन यांनी दाखल केलेल्या रिट याचिका ४६०/२००४ मध्ये सर्वोच्च न्यायालय दिल्ली तर्फे दि. ४/१२/२००६ रोजी पारित केलेले आदेश.
२) पर्यावरण आणि वनविभाग केंद्र सरकार (वन्यजीव विभाग) कडील परिपत्रक क्रमांक एफ नं. ६-१०/२०११ दि. १९/१२/२०१२ नुसार पारित झालेले आदेश.

संदर्भ क्र. १ नुसार प्राप्त झालेल्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामार्फत राष्ट्रीय उद्यानाच्या वनहद्दीसभोवताल पर्यावरण संवेदनाशील क्षेत्र घोषीत करणे कामीचा प्रस्ताव तयार करुन शासन स्तरावर मंजुरी कामी सादर करण्यात आलेला आहे. परंतू अद्यापी त्यास केंद्रीय स्तरावरुन मंजुरी प्राप्त झालेली नाही. तोपर्यंत संदर्भ क्र. २ नुसार प्राप्त झालेल्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनहद्दीपासुन १० किमी परिसरातील चालु असलेल्या अथवा प्रस्तावित व्यावसायीक बांधकामांस (ज्यांचे बांधकाम क्षेत्र २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त आहे.) नॅशनल बोर्ड ऑफ वाईल्ड लाईफ (NBWL) यांच्या स्थायी समितीची शिफारस ही पर्यावरण मान्यतेसाठी घेणे अत्यावश्यक आहे.

मेसर्स ओबेराय कन्स्ट्रक्शन लिमीटेड यांनी मौजे मुलूंड सर्वे न. २२७(पैकी), २२८(पैकी), २२९(पैकी) (नगर भूमापन क्र. ४७५, ४७५/१ ते ११) तसेच मौजे नाहुर सर्वे क्र. ९१ (पैकी) १४९(पैकी) १५६(पै) (नगर भुमापन क्र. ५४३, ५४५, ५४६, ५४६/१ आणि २) च्या क्षेत्रात व्यावसायीक बांधकाम विकास प्रकल्प राबवित असुन सदर प्रकल्पातील बांधकाम क्षेत्र हे २०००० चौ.मी. पेक्षा जास्त असल्याने वरील संदर्भान्वये आवश्यक असलेल्या परवानगी कामी अद्यापी संबंधीतानी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानास अर्ज दाखल केलेला नाही. मेसर्स ओबेरॉय कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्या सदरच्या बांधकामा बाबत तक्रारी या कार्यालयास येत असल्याने आपल्या स्तरावर सदर बांधकाम प्रकल्पाबाबत वरील संदर्भान्वये आवश्यक ती पुर्तता झाली आहे किंवा नाही

याची कृपया खात्री करुन घेण्यात यावी व त्यानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे मुख्य वनसंरक्षक व संचालक यांच्या कार्यालयास कळविण्यात यावे ही विनंती आहे.

सहाय्यक वनसंरक्षक संरक्षण (वन्यजीव)
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

प्रत :- मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांच्या मौखिक आदेशानुसार तयार करण्यात आलेले सदरचे पत्र अवलोकनार्थ सादर.

प्रत :- मेसर्स ओबेरॉय कन्सट्रक्शन लिमिटेड कॉमर्झ,तिसरा मजला, इंटरनॅशनल बिझनेस पार्क, ओबेरॉय गार्डन सिटी, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे गोरेगांव (पुर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी रवाना.

बृहन्मुंबई महानगर पालिका
उपप्रमुख अभियंता इमारत प्रस्ताव
(पूर्व उपनगरे) यांचे कार्यालय
04 DEC 2015
वेळ :- 14423
११,१२,१३,१४,१५,१६,१७

we have written to them to forward the plan showing their boundary to ascertain 10km. Pl. spk.

4/12/15

5/12/15